Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२७ जानेवारी, २०१९
: 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक २६/०१/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, रामनगर, बल्लारशाह, वरोरा, शेंगाव, मुल, सावली, पोंभुर्णा, कोठारी** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१२** गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **१,३०,९५०/—रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

### १)पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर :—

दिनांक **२६/०१/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर** अंतर्गत चांदा फोर्ट रेल्वे स्टेशन येथे ०४ आरोपी ईसम हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **चंद्रपुर शहर** येथे अप. क्र. **१०७/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०४ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **६,१२०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **चंद्रपुर शहर** पोलीस करीत आहे.

---

### २)पोलीस स्टेशन भिसी :—

दिनांक **२६/०१/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **भिसी** अंतर्गत मेरेपार आंगणवाडी जवळ ०५ आरोपी ईसम हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **भिसी** येथे अप. क्र. **२६/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०५ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **८,४००/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **भिसी** पोलीस करीत आहे.

---

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# पोलीस स्टेशन भद्रावती यांची धडाकेबाज कार्यवाही

- दारूबंदीच्या गुन्हयातील पाहिजे असलेले २८ आरोपीं अटक ३ आरोपींना सुचनापत्र .
- ऑपरेशन ऑल ऑउट दरम्यान पहाटे करण्यात आली कार्यवाही.
- अवैध दारूबाबत बरांज तांडा गावाजवळील जंगलपरिसर काढले पिंजुन ०५ आरोपी अटक.
- १०० पोलीस अधिकारी कर्मचारी यांनी घेतला ऑपरेशन ऑल ऑउट मध्ये सहभाग.

दिंनाक २७ जानेवारी २०१९ रोजी पोलीस स्टेशन भद्रावती येथे दारूबंदीच्या दाखल ५६ गुन्हयांमध्ये पाहिजे असलेल्या ३५ आरोपींचा शोध व अटक करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात ऑपरेशन ऑल ऑउट मोहिम राबविण्यात आली.

पोलीस स्टेशन भद्रावती येथे बरांज तांडा आणि पिपरबोडी या दोन गावांमधील अनेक आरोपी अवैध गुळ दारू बनविण्याच्या व्यवसायात गुंतलेले असुन त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल होते. परंतु पोलीस अटक करायला गेले की कोणीही आरोपीतांचे नाव, ओळख सागंत नसल्याने आणि पोलीसांची चाहुल लागताच जंगलात पळुन जाणे यामुळे आरोपीना अटक करणे अवघड झाले होते. त्यामुळे पोलीस स्टेशन भद्रावती येथे सुमारे ५६ केसेस पेंडींग असुन त्यातील काही केसेस १ वर्षापेक्षा जुन्या देखील होत्या. या अनुषंघाने यामध्ये एकुण ३५ वॉन्टेड आरोपी अटक करणे असल्याने भद्रावती पोलीस स्टेशनने ऑल ऑउट मोहिमेचे नियोजन केले.

सदर मोहिमेकरीता पोलीस मुख्यालय चंद्रपुर येथुन आरसीपी पथकाचे ४८ कर्मचारी तसेच वरोरा विभागातुन १२ आणि भद्रावती पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी असे एकुण १०० अधिकारी कर्मचारी पहाटे ०४ वाजता पोलीस स्टेशन भद्रावती येथे बोलविण्यात आले. व त्यांना या मोहिमेत करावयाच्या कार्यवाहीविषयी माहिती देउन सुचना देण्यात आल्या. मोहिमेचे नियोजन करतांना गुगल अर्थच्या सहाय्याने बरांज तांडा गावाचा नकाशा, आरोपींची ओळख पटविण्यासाठी त्या गावाची मतदार यादी मिळविण्यात आली. गुगल अर्थच्या मॅप मध्ये कोणते घर कोणाचे याचे मार्किंग करून गावाची विभागणी ५ भागात केली व प्रत्येकी भागासाठी १ अधिकारी ३ पुरूष कर्मचारी व २ महिला कर्मचारी अशी ६ जणांची टिम तयार करण्यात आली.

☎ : 07172-264300
📠: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

पहाटे ५ वाजता सर्व पोलीस दलाने गावाकडे कुच केली. कोणीही गावातुन जंगलात पळुन जाणार नाही यासाठी आरसीपी पथकाच्या ३ टीम तयार करून त्यांना गावाला तिन्ही बाजुंनी घेराव करून उभे केले. वरोरा उपविभागाच्या टिमला गावाची समोरच्या बाजुस तैनात केले. त्यानंतर सहाही टिम त्यांना नेमुन दिलेल्या भागात गेल्या व सुर्योदय होताच ठरल्याप्रमाणे पाहिजे आरोपींच्या घरी जावुन आरोपी ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. अशा प्रकारे बेसावध असतांना पहाटे जाउन मोहिम राबविल्यामुळे आणि सर्व बांबींचे नियोजन केल्यामुळे यामोहिमेत ३१ पाहिजे असलेले आरोपी मिळुन आले. यापैकी २८ आरोपी अटक करण्यात पोलीसांनी यश आले असुन ३ आरोपींना सुचनापत्र देण्यात आले आहे.

आरोपी अटक झाल्यानंतर पोलीसांनी आणखी ४ टीम तयार करून बरांज तांडा गावाच्या सभोवताली जंगल परिसरात अवैध दारूबाबत शोध घेतला असता दारूच्या भट्टयात तयार करण्यात आलेला गुळ सडवा दारू एकुण किंमत १६ लाख रूपयाचा माल नष्ट करण्यात आला असुन १० भट्ट्यांचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. सदर गुन्हयात ५ आरोपीस अटक करण्यात आले आहे. अशा प्रकारे पाहिजे असलेले २८ व २७/०१/२०१९ रोजीच्या गुन्हयातील ५ असे एकुण ३३ आरोपी अटक करण्यात आले व ३ आरोपींना सुचनापत्र देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर व श्री. प्रताप पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा यांचे मार्गदर्शनात, परिविक्षाधिन पोलीस उपअधीक्षक श्री. अमोल मांडवे यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन भद्रावती येथील सर्व अधिकारी कर्मचारी, आरसीपी पथक, वरोरा उपविभागाचे कर्मचारी यांनी पार पाडली.

---

चंद्रपूर पोलीस